

श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe **इयत्ता – सहावी (10 जुलै) माझा अभ्यास** Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

# दिवस दहावा :






गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

टेस्ट सोडवा

सायकल म्हणते, मी आहे ना!

## वाचा व समजून घ्या.

- **खालील नामांचे दिलेल्या सारणीमध्ये योग्य वर्गीकरण करा.** **सराव करा.**

सतलज, बाग, कविता, लाडू, आंबेगाव, शाळा, कीटक, झेंडा, लाकूड, प्राजक्ता, मराठी, आई, कापड, बंडू, सह्याद्री.

| | |
|---|---|
| **सामान्यनाम** | |
| **विशेषनाम** | |

- **खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द पाहा.**

१. मला सशाची चपळाई आवडली.

२. त्याची आई माझ्याशी आपुलकीने बोलली.

३. नीताच्या आवाजात गोडवा आहे.

४. कोणालाच गुलामगिरीत राहणे पसंत नसते.

वरील अधोरेखित शब्द भाववाचकनामे आहेत. हे शब्द वस्तू किंवा प्राण्यांची नावे नाहीत. भाववाचक नामांतून आपल्याला व्यक्ती, वस्तू, पदार्थ यांच्यातील भाव, गुणधर्म व स्वभाव वैशिष्ट्ये यांचा बोध होतो. त्या शब्दांतील भाव समजून घ्यावा लागतो. तो दृश्य स्वरूपात नसतो.

- **खालील उतारा वाचा. त्यातील घटना क्रमाने सांगा.**

मे महिन्याचा तिसरा आठवडा असावा. घरात बसवत नव्हते. प्रचंड उकाडा होता. शरीराची लाही लाही होत होती. सारखे पाणी प्यावेसे वाटत होते. उन्हाच्या तीव्रतेमुळे आकाशात पक्षीही फिरकेनासे झाले होते. सर्वत्र शुकशुकाट होता. सूर्य पश्चिमेकडे हळूहळू कलू लागला. उन्हाच्या झळा कमी होऊ लागल्या. अचानक ढगांनी आकाशात गर्दी गेली. जोराचे वारे वाहू लागले. झाडांची गळलेली पाने, कचरा, माती उडू लागली. गोलगोल फिरू लागली. वाऱ्याचे भोवरे तयार झाले. मी हे सगळे खिडकीतून पाहत होतो. सगळीकडे इतका धुराळा उडत होता, की बाहेरचे काही दिसत नव्हते.


अचानक विजा चमकू लागल्या. ढग एकमेकांवर आपटू लागले. विजांचा थयथयाट, ढगांचा गडगडाट अन् घोंगावणारा भयंकर वारा, वातावरण भयावह झाले. त्यात पावसाचे टपोरे थेंब घरांच्या कौलांवर, पत्र्यांवर आपटू लागले. निसर्गाचे हे रौद्र रूप पाहून मी हबकून गेलो. अचानक माझे लक्ष आकाशाकडे गेले. कोणाच्यातरी घराचे पत्रे चटईसारखे उडत आमच्या घराच्या दिशेने येत होते. मी खूप घाबरलो. तेवढ्यात ते उडत आलेले पत्रे आमच्या घराच्या मागच्या बाजूला कोसळले. घरातील माणसे जोरात ओरडली. लहान मुले घाबरून रडू लागली. सगळे घाबरेघुबरे होऊन एका जागेवर खिळल्यासारखी बसून राहिली. हळूहळू वाऱ्याचा वेग मंदावला. पाऊस थांबला. आकाशही निरभ्र होऊ लागले. सगळे घराबाहेर पडू लागले. दीड-दोन तास निसर्गाच्या चाललेल्या या भयंकर खेळाविषयी जो तो आपल्या भावना व्यक्त करू लागला.


वाचा व सरावसंच सोडवा.

2 कोन

टेस्ट सोडवा

**गणित माझा सोबती : जत्रेत, घरात, बागेत.**





वरील चित्रे पाहा व कोनांचे प्रकार ओळखा.

## सरावसंच 2


1. जोड्या लावा.

| कोनाचे माप | कोनाचा प्रकार |
|---|---|
| (1) 180° | (a) शून्य कोन |
| (2) 240° | (b) सरळ कोन |
| (3) 360° | (c) प्रविशाल कोन |
| (4) 0° | (d) पूर्ण कोन |

2. खाली कोनांची मापे दिली आहेत, त्यांवरून प्रत्येक कोनाचा प्रकार लिहा.

| | |
|---|---|
| (1) 75° | (2) 0° |
| (3) 215° | (4) 360° |
| (5) 180° | (6) 120° |
| (7) 148° | (8) 90° |

3. खालील आकृत्या पाहा व कोनांचा प्रकार लिहा.



(*a*) (b) (c)




(d) (e) (f)

4. कोनमापकाच्या साहाय्याने लघुकोन, काटकोन व विशालकोन काढा.

टेस्ट सोडवा

## Read and solve the practice set.

My friend, Maths : At the fair, at home, in the garden.



Look at the pictures above and identify the different types of angles.

### Practice Set 2


1. Match the following.


| Measure of the angle | Type of angle |
|---|---|
| (1) 180° | (a) Zero angle |
| (2) 240° | (b) Straight angle |
| (3) 360° | (c) Reflex angle |
| (4) 0° | (d) Complete angle |


2. The measures of some angles are given below. Write the type of each angle.

| | |
|---|---|
| (1) 75° | (2) 0° |
| (3) 215° | (4) 360° |
| (5) 180° | (6) 120° |
| (7) 148° | (8) 90° |

3. Look at the figures below and write the type of each of the angles.


(a)


(b)


(c)


(d)


(e)


(f)

4. Use a protractor to draw an acute angle, a right angle and an obtuse angle.

## Read and understand.

**8. All sorts of lists !**

(a) Choose any one of the following topics to make a list. Try to list as many items as possible within two minutes.

THINGS AND PEOPLE IN THE CLASSROOM
..............
..............
..............

THINGS YOU MAY SEE IN THE KITCHEN
..............
..............

THINGS YOU MAY NEED ON A PICNIC
..............
..............
..............
..............
..............

THINGS WE CANNOT SEE
..............
..............
..............
..............
..............

GAMES YOU LIKE
..............
..............
..............
..............
..............

WORDS BEGINNING WITH 'C'
..............
..............
..............
..............

ACTIONS YOU CAN DO WITH YOUR HAND/S
..........
..........
..........
..........

WHITE THINGS
..............
..............
..............
..............
..............

THINGS YOU SEE AT A RAILWAY STATION
..........
..........
..........
..........

HN6559

(b) Now, put the words in your list in alphabetical order.

(c) Compare your lists. Try to describe the items in your list – mention their shape, size, colour, number, etc. and write meaningful phrases.

टेस्ट सोडवा




**9. Complete the sentences in the yellow track using phrases from the green field.**

his father. | in group B. | our teacher. | my friend. | our leader. | her brother. | in your group. | in the same school. | their neighbour. | in their group.

You are ...... .
She is .......... .
They are .......... .
He is .......... .
I am .......... .
We are .......... .
You are .......... .

टेस्ट सोडवा

# २. इतिहासाची साधने

पाठ वाचा व समजून घ्या.


खापराचा तुकडा


दागदागिने


भांडी

**माहीत आहे का तुम्हांला ?**

मंदिरांच्या भिंती, लेण्यांच्या भिंती, शिळा, ताम्रपट, भांडी, कच्च्या विटा, ताडपत्रे, भूर्जपत्रे इत्यादींवर कोरलेल्या लेखांचा समावेश लिखित साधनांत होतो.


ताम्रपट


शिलालेख

## २.२ लिखित साधने

अश्मयुगातील माणसाने त्याच्या जीवनातील अनेक प्रसंग आणि भावना चित्रांतून व्यक्त केल्या आहेत. हजारो वर्षे उलटल्यानंतर माणसाला लिहिण्याची कला अवगत झाली.

माणूस सुरुवातीला प्रतीके, चिन्हे यांचा वापर नोंदी ठेवण्यासाठी करत असे. त्यांपासून लिपीचा विकास होण्यास हजारो वर्षे जावी लागली.

सुरुवातीच्या काळात खापरे, कच्च्या विटा, झाडाची साल, भूर्जपत्रे यांसारख्या साहित्याचा लिहिण्यासाठी उपयोग केला जाई. अशा प्रकारच्या साहित्यावरील मजकूर एखाद्या अणकुचीदार साधनाने कोरलेला असे. अनुभव व ज्ञान जसजसे वाढत गेले, तसतसे त्याने विविध पद्धतींनी लेखन करण्यास सुरुवात केली. सभोवताली घडलेल्या घटना, दरबारी कामकाजाचे वृत्तान्त इत्यादी माहिती लिहून ठेवण्याची पद्धत सुरू झाली. अनेक राजांनी आपल्या आज्ञा, निवाडे, दानपत्रे दगडांवर किंवा तांब्याच्या पत्र्यांवर कोरून ठेवली आहेत. कालांतराने वाङ्‌मयाचे अनेक प्रकार निर्माण झाले. धार्मिक-सामाजिक स्वरूपाचे ग्रंथ, नाटके, काव्ये, प्रवासवर्णने तसेच शास्त्रीय विषयांवरील लेखन झाले. या साहित्यातून त्या त्या काळाचा इतिहास समजण्यास मदत होते. या सर्व साहित्याला इतिहासाची 'लिखित साधने' असे म्हणतात.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

भूर्जपत्र हे भूर्ज वृक्षाच्या सालीपासून बनवले जाते. भूर्ज वृक्ष काश्मीरमध्ये आढळतात.


भूर्ज वृक्ष


भूर्जपत्र

# १. पृथ्वी आणि वृत्ते

टेस्ट सोडवा

**भौगोलिक स्पष्टीकरण**

## निरीक्षण करून समजून घ्या.

### ✲ रेखावृत्ते

तुमच्या असे लक्षात येईल की अ,ब,क हे पृथ्वीच्या 'म' या केंद्राशी विषुववृत्ताच्या प्रतलावर होणारे कोन आहेत. या बिंदूतून उत्तर व दक्षिण ध्रुवांना जोडणाऱ्या अर्धवर्तुळाकार रेषा काढता येतात. याप्रमाणे 'अम' पासून प्रत्येक अंशावर अर्धवर्तुळे काढता येतात. यांना रेखावृत्त म्हणतात. रेखावृत्तांपैकी एक रेखावृत्त ०° मानले जाते. ०° रेखावृत्ताला मूळ रेखावृत्त म्हणतात. या रेखावृत्तापासून इतर रेखावृत्तांची कोनीय अंतरे अंशामध्ये सांगितली जातात. त्यांना रेखांश म्हणतात. जसे तुम्ही आकृती १.९ ची कृती करताना मोजलेत. ०° रेखावृत्त व १८०° ही रेखावृत्ते पृथ्वीगोलावर एकमेकांसमोर येतात. त्यांच्यामुळे तयार होणारे वर्तुळ पृथ्वीची पूर्व गोलार्ध व पश्चिम गोलार्ध अशी विभागणी करते. अक्षवृत्ते जशी ध्रुवांकडे लहान लहान होत जातात तशी रेखावृत्ते होत नाहीत. सर्व रेखावृत्ते आकाराने सारखीच असतात.

रेखावृत्तांची मूल्ये सांगताना पूर्व गोलार्धात १०° पू., २५° पू., १३५° पू. याप्रमाणे; तर पश्चिम गोलार्धात १०° प., २५° प., १३५° प. अशी सांगितली जातात.

०° रेखावृत्ताच्या पूर्वेकडे ३०° कोनीय अंतर असलेल्या सर्व ठिकाणांना जोडणारी अर्धवर्तुळाकार रेषा ३०° पू. रेखावृत्त होय. या रेखावृत्तावर आफ्रिकेमधील कैरो, हरारे, दर्बन इत्यादी ठिकाणे येतात. आकृती १.६ पहा.

एवढ्या मोठ्या आकाराच्या पृथ्वीवरील ठिकाणांचे स्थान अक्षांश व रेखांशामुळे अचूकपणे सांगता येते. लगतच्या कोणत्याही दोन अक्षवृत्तांमधील अंतर सर्व ठिकाणी सारखेच असते. लगतच्या कोणत्याही दोन रेखावृत्तांमधील अंतर मात्र सर्व ठिकाणी सारखे नसते हे संत्र्याच्या फोडींच्या निरीक्षणावरून तुमच्या लक्षात येईल. पृथ्वीच्या गोल आकारामुळे विषुववृत्तापासून उत्तर व दक्षिण गोलार्धात या रेखावृत्तांमधील अंतर कमी कमी होत जाते, तर दोन्ही ध्रुवांवर ते अंतर शून्य इतके असते.

लगतच्या कोणत्याही दोन अक्षवृत्तांमधील पृथ्वीपृष्ठावरील अंतर १११ किमी असते. तसेच विषुववृत्तावर लगतच्या कोणत्याही दोन रेखावृत्तांमधील अंतर १११ किमी असते. १११ किमी दरम्यान असलेल्या ठिकाणांची अचूक स्थाने सांगण्यासाठी, अंशाची विभागणी लहान एककात करावी लागते. अंशाची ही विभागणी मिनिट या एककात तर मिनिटाची विभागणी सेकंद या एककात केली जाते. अक्षांश व रेखांश यांची मूल्ये अंश, मिनिट, सेकंद या एककामध्ये सांगण्याची पद्धत आहे. यामध्ये अंशाचे ६० भाग होतात व प्रत्येक भाग एक मिनिटाचा असतो. तसेच मिनिटाचे ६० भाग होतात व प्रत्येक भाग एक सेकंदाचा असतो. ही मूल्ये चिन्हांनी पुढीलप्रमाणे दाखवता येतात. अंश (... °), मिनिट (...'), सेकंद (...")

प्रत्येकी १° च्या अंतराने एकूण ३६० रेखावृत्ते काढता येतात.

- ०° मूळ रेखावृत्त
- १८०° रेखावृत्त
- १° पूर्व ते १७९° पूर्व रेखावृत्ते, म्हणजेच पूर्व गोलार्धात एकूण १७९ रेखावृत्ते असतात.
- १° पश्चिम ते १७९° पश्चिम रेखावृत्ते, म्हणजेच पश्चिम गोलार्धात एकूण १७९ रेखावृत्ते असतात.



**जरा विचार करा !**

जगाच्या नकाशात रेखावृत्ताचे वाचन करण्याचा खेळ वर्गात चालू आहे. शाहीन व संकेत एकमेकांना विशिष्ट रेखावृत्तावरील ठिकाण शोधण्यास सांगतात व नोंदी घेतात. शाहीनने संकेतला १८०° रेखावृत्तांवरील रेंगल बेट (Wrengel) शोधायला सांगितले. संकेतने रेंगल बेट हे ठिकाण नकाशात शोधले. परंतु रेखावृत्तांचे मूल्य १८०° पूर्व किंवा १८०° पश्चिम यांपैकी नेमके काय लिहावे, या विचारात दोघेही आहेत. तुम्ही त्यांना मदत करा. ०° रेखावृत्तासंदर्भाने सुद्धा असाच विचार करता येईल काय ?

# १ नैसर्गिक संसाधने – हवा, पाणी आणि जमीन



## आपण काय शिकलो ?

**स्वाध्याय सोडवा.**

- सजीवांच्या मूलभूत गरजा भागवणारे व निसर्गातून मिळणारे घटक म्हणजे नैसर्गिक संसाधने होय.
- हवा,पाणी व जमीन ही महत्त्वाची नैसर्गिक संसाधने आहेत.
- जमीन आणि मृदा एकच नसून त्यांत फरक आहे.
- मृदेमध्ये जैविक व अजैविक घटक असतात.
- हवेमध्ये नायट्रोजन, ऑक्सिजन, कार्बन डाय ऑक्साइड, निष्क्रीय वायू, बाष्प व धूलिकण असे अनेक घटक आहेत.
- ओझोनचा थर पृथ्वीचे संरक्षक कवच आहे.
- नैसर्गिक संसाधने काळजीपूर्वक व काटकसरीने वापरावीत.

टेस्ट सोडवा

DV32EY

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

अ. ओझोन वायूचा थर सूर्यापासून पृथ्वीवर येणारी.......... किरणे शोषून घेतो.

आ. पृथ्वीवर गोड्या पाण्याचा एकूण ....... टक्के साठा उपलब्ध आहे.

इ. मृदेमध्ये................व..........घटकांचे अस्तित्व असते.

**२. असे का म्हणतात ?**

अ. ओझोन थर पृथ्वीचे संरक्षक कवच आहे.

आ. पाणी हे जीवन आहे.

इ. समुद्राचे पाणी पिण्यायोग्य नसले तरी उपयुक्त आहे.

**३. काय होईल ते सांगा.**

अ. मृदेतील सूक्ष्मजीव नष्ट झाले.

आ. तुमच्या परिसरात वाहने व कारखान्यांची संख्या वाढली.

इ. पिण्याच्या पाण्याचा संपूर्ण साठा संपला.

**४. सांगा मी कोणाशी जोडी लावू ?**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. कार्बन डायॉक्साइड | अ. मृदेची निर्मिती |
| २. ऑक्सिजन | आ. पाऊस |
| ३. बाष्प | इ. वनस्पती व अन्ननिर्मिती |
| ४. सूक्ष्मजीव | ई. ज्वलन |

**५. नावे लिहा.**

अ. जीवावरणाचे भाग    आ. मृदेचे जैविक घटक

इ. जीवाश्म इंधन    ई. हवेतील निष्क्रीय वायू

उ. ओझोनच्या थरास घातक असणारे वायू

**६. खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

अ. जमीन आणि मृदा ही एकच असते.

आ. जमिनीखाली असणाऱ्या पाण्याच्या साठ्याला भूजल म्हणतात.

इ. मृदेचा २५ सेमी जाडीचा थर तयार होण्यास सुमारे १००० वर्षे लागतात.

ई. रेडॉनचा वापर जाहिरातींसाठीच्या दिव्यांत करतात.

**७. खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.**

अ. मृदेची निर्मिती कशी होते हे आकृती काढून स्पष्ट करा.

आ. पृथ्वीवर सुमारे ७१% भूभाग पाण्याने व्यापलेला असून देखील पाण्याची कमतरता का भासते ?

इ. हवेतील विविध घटक कोणते ? त्यांचे उपयोग लिहा.

ई. हवा, पाणी, जमीन ही बहुमोल नैसर्गिक संसाधने का आहेत ?

**उपक्रम :**

- भारतीय हवामानशास्त्र संस्थेच्या कार्याविषयी सविस्तर माहिती मिळवा.
- पाणीटंचाईवर उपाय शोधा.

# 1. Natural Resources – Air, Water and Land

solve.

## What we have learnt–

- The elements available in nature which fulfil the basic needs of living things are called natural resources.
- Air, water and land are important natural resources.
- Soil has both biotic and abiotic constituents.
- There are many constituents of air such as nitrogen, oxygen, carbon dioxide, inert gases, water vapour and dust particles.
- The ozone layer is a protective shell of the earth.
- Natural resources should be used carefully and sparingly.

## Exercise

**1. Fill in the blanks.**

(a) The layer of ozone gas absorbs ………… rays that come from the sun to the earth.

(b) Of the total water available on the earth, fresh water forms ...... percent.

(c) Both ....... and ……... constituents are present in the soil.

**2. Why is it said that – ?**

(a) The ozone layer is a protective shell of the earth.

(b) Water is life.

(c) Seawater is useful even though it is not potable.

**3. What will happen if –**

(a) Microbes in the soil get destroyed.

(b) The number of vehicles and factories in your surroundings increases.

(c) The total supply of potable water is finished.

**4. Match the following.**

| Group 'A' | Group 'B' |
|---|---|
| (1) Carbon dioxide | (a) Generation of soil |
| (2) Oxygen | (b) Rain |
| (3) Water vapour | (c) Plants and food production |
| (4) Microbes | (d) Combustion |

**5. Name the following.**

(a) Constituents of the biosphere

(b) Biotic constituents of soil

(c) Fossil fuel

(d) Inert gases in air

(e) Gases that are harmful to the ozone layer

**6. True or false ?**

(a) Land and soil are the same thing.

(b) The water in a lake is called ground water.

(c) It takes about 1000 years to form a 25 cm thick layer of soil.

(d) Radon is used in decorative lights.

**7. Answer in your own words.**

(a) Explain with the help of a diagram how soil is formed.

(b) Why is there a shortage of water even though it occupies about 71% of the earth's surface ?

(c) What are the various constituents of air ? Write their uses.

(d) Why are air, water and land considered to be valuable natural resources ?

**Activity :**

- Obtain detailed information about the work of the India Meteorological Department.
- Find a remedy for water scarcity.

टेस्ट सोडवा

- **सुनो और गाओ :**

रियाज

## २. बसंती हवा

– केदारनाथ अग्रवाल


**जन्म :** १ अप्रैल १९११, **मृत्यु :** २२ जून २००० **रचनाएँ :** 'देश-देश की कविताएँ', 'अपूर्वा', 'आग का आईना', 'पंख और पतवार', 'पुष्पदीप' आदि। **परिचय :** आप छायावादी युग के प्रगतिशील कवि माने जाते हैं।


प्रस्तुत कविता 'बसंती हवा' में मस्ती भरे शब्दों द्वारा हवा की अठखेलियों का विवरण दिया है।



**स्वयं अध्ययन**

**(१) नीचे दिए गए चित्रों की सहायता से प्राकृतिक सुंदरता दर्शाने वाला एक चित्र बनाकर उसमें रंग भरो।**
**(२) अपने चित्र के बारे में बोलो।**





हवा हूँ, हवा मैं
बसंती हवा हूँ।
सुनो बात मेरी–
अनोखी हवा हूँ।
बड़ी बावली हूँ,
बड़ी मस्तमौला।
नहीं कुछ फिकर है,
बड़ी ही निडर हूँ।
जिधर चाहती हूँ,
उधर घूमती हूँ।
मुसाफिर अजब हूँ।
हवा हूँ, हवा मैं,
बसंती हवा हूँ।

चढ़ी पेड़ महुआ,
थपाथप मचाया,
गिरी धम्म से फिर,
चढ़ी आम ऊपर,
उसे भी झकोरा,
किया कान में 'कू',
उतरकर भागी मैं,
हरे खेत पहुँची–
वहाँ, गेहुँओं में
लहर खूब मारी।
हवा हूँ, हवा मैं,
बसंती हवा हूँ।

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| सहावी मराठी | सहावी गणित | सेमी गणित | सहावी इंग्रजी | सहावी इतिहास |
|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| सहावी भूगोल | सहावी विज्ञान | सेमी विज्ञान | सहावी हिंदी |
|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here